स्वतंत्र विचारसरणीचे मराठी साप्ताहिक

Chat on.......
www.eparbhani.com
ई. परभणी डॉट कॉम
अधिक माहिती करीता
☎ २२२१५३

# लोकव्यथा


नेत्रदान करा
मरणोत्तर सृष्टी बघा

रजि. ऑफ न्युज पेपर रजि. नं. ३७७११/८० ☎ २२२१५३ पो. रजि. क्र. जी-२/पीआरबी/आरएनपी/४७/२००९-११

वर्ष ३० वे अंक २५वा | शुक्रवार दि.१८जुन २०१० | जेष्ट शु.७ १९३२ | पाने ४ | किंमत २ रु.

# परभणीतील हे रत्न मराठवाड्याचे मानक ठरावे-प्रा.डॉ.पागे




छाया-भारत फेटो, परभणी

## प्रा.रामदास डांगे यांचा भव्य नागरी सत्कार व प्रा.डांगे लिखीत श्री ज्ञानदेवी ग्रंथाचे दादा महाराज मनमाडकर यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न

परभणी- सातत्याने ज्ञानाचे दातृत्व बाळगणारे आणि हृदयात माऊलीचे मातृत्व सांभाळणारे संत साहित्याचे अभ्यासक प्राचार्य रामदास डांगे यांच्या मुर्तीवंत तपश्चर्येतून मुलपाठ दिपीका श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आज प्रकाशित होत आहे. ऋषीतुल्य व्यक्तीमत्व असणारे हे परभणीतील रत्न मराठवाड्याचे मानक ठरावे अशी अपेक्षा प्रसिद्ध भागवत भाष्यकार प्रा.डॉ.वि.मा.पागे यांनी व्यक्त केली.

प्राचार्य रामदास डांगे नागरी सत्काराने ग्रंथराज श्री ज्ञानदेवी प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.डॉ.पागे बोलत होते. परभणी शहरातील कल्याण मंडपम् येथे आयोजित प्राचार्य रामदास डांगे यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी न्या.नरेंद्र चपळगावकर यांच्यासह ह.भ.प. दादा महाराज मनमाडकर, अध्यक्ष उर्वरित वैधानिक विकास महामंडळ पुणे आ.उल्हासदादा पवार, प्रा. प्रकाश सुमन, जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.कुसूमताई लोहगावकर, आ.संजय जाधव,माजी आ.ॲड. विजयराव गव्हाणे, ॲड.वसंतराव पाटील यांची उपस्थिती होती. पूढे बोलतांना डॉ.पागे म्हणाले, आजचा दिन हा सोनियाचा दिन असुन या कार्यक्रमास आपण उपस्थित राहू शकलो हे आपले भाग्य होय. प्राचार्य रामदास डांगे यांनी मुलपाठ दिपीका श्री ज्ञानदेवीच्या कार्यासाठी जे संशोधन केले आहे ते कार्य निश्चीतच कौतुकास्पद होय. एक ऋषीतुल्य व्यक्तीमत्वाकडून हे कार्य घडलेले आहे. सत्कार्य घडावे या हेतूनेच त्यांचा जन्म झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. संशोधनाचे कार्य केल्यानंतर अनेकजण कर्म आणि जन्मभुमी सोडून पुणे अथवा मुंबई येथे वास्तव्यास जातात असा आपला अनुभव आहे. रामदास डांगे यांनी पुढील संशोधन देखील परभणीत राहूनच करावे. परभणीकरांनी त्यांना प्रेमाचा तसा आग्रह करावा अशी विनंतीही पागे यांनी केली. प्राचार्य डांगे यांच्यासोबत काम करण्याची संधी आपल्याला मिळाली हे आपले भाग्य समजतो. एक ऐतिहासिक कार्य त्यांनी पूर्ण केले असुन एक-एक शब्दाकरीता त्यांनी जे संशोधन केले आहे ते कौतुकास्पद होय. ज्ञानाच्या गंगोत्रीचा खरा शोध त्यांनी घेतला असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.पाठचिकीत्सा पद्धतीशास्त्र याची शाखा परभणीत व्हावी आणि त्याची जबाबदारी प्राचार्य डांगे यांच्याकडे यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आजपर्यंत डांगे यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणुन विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट या उपाधीने सन्मानित करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी बोलतांना उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हासदादा पवार म्हणाले, अनेक कार्यक्रमांना आपल्याला जावे लागते तर काही कार्यक्रम आत्मियतेचे असतात त्यामुळे जावे लागते. आजचा हा कार्यक्रम आत्मीयतेने जावा असा होय. मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये ज्ञानेश्वरी,भगवत गिता यांच्या हस्तलिखीत प्रती आहेत हे ऐकुण मनस्वी आनंद होत आहे. ज्ञानेश्वरीच्या संदर्भात डांगे यांनी केलेल्या संशोधनाची तुलना होऊ शकत नाही. हे संशोधन प्रसिद्धी पराङमुख राहून हे कार्य केले आहे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता करण्यात आलेले हे कार्य होय. आजच्या शिक्षण पद्धतीवर यावेळी आ.पवार यांनी टिका केली. साने गुरुजी यांना अभिप्रेत असणारा गुरुजी आज दिसत नाही असे सांगून साने गुरुजींना अभिप्रेत असणारा गुरुजी निर्माण व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उदंड आयुष्य प्राचार्य डांगे यांना लाभावे असेही ते म्हणाले. ज्ञानदेवी या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर अशिर्वचन मार्गदर्शनात ह.भ.प.दादा महाराज मनमाडकर म्हणाले, पूर्णत्व हे परमेश्वराशिवाय प्राप्त होत नाही आणि त्यासाठी सद्गुरुची कृपा हवी आहे. डांगे यांच्यावर सद्गुरु माऊलींची कृपा आहे त्यामुळेच इतके कठीण कार्य त्यांच्या हातून घडले आहे. भगिरथा सारखे कार्य डांगे यांनी करून दाखविले आहे त्याचा उपयोग आपण सर्वांनी करून घेतला पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी प्रा.प्रकाश सोमन यांच्यासह आ.बंडू जाधव, माजी आ.विजय गव्हाणे यांची समयोचित भाषणे झाली. स्वागताध्यक्ष मा.खा. शेषराव देशमुख यांनी प्रास्ताविकात अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम डांगे यांच्या हातून झाले आहे. यापुढेही ज्ञानदेवी संशोधनासारखे त्यांनी करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सत्काराला उत्तर देतांना प्राचार्य डांगे म्हणाले, आज विचारवंतांची दिशा आणि दशा अतिशय भयावह झाली आहे. आजच्या सत्कारामुळे आपण भारावून गेलो आहोत. परभणीकरांनी आपल्यावर केलेले प्रेम हे कदापिही विसरू शकणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी डॉ.दत्तात्रय मगर, ज्ञा.श्री.मुंडे, ॲड.न.चि. जाधव, डॉ. तुकाराम गरुड, हेमराज जैन, ॲड.अशोक सोनी, ॲड. अनंतराव उमरीकर, देवीदास कुलकर्णी, पुनमचंद मुथा, एस.एस.नांदापूरकर, डॉ. विवेक नावंदर, प्राचार्य शिवाजी दळणर, शिक्षण सभापती धोंडीराम चव्हाण, नगरसेवक संजय देशमुख, प्रमोद वाकोडकर,प्रा.आनंद देशपांडे उपस्थित होते.




इयत्ता दहावीच्या परिक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या नम्रता विजयकुमार मुंदडा या विद्यार्थीनीचे कौतुक करतांना सौ.उज्वला मुंदडा व दै.सांज वृत्तचे संपादक ॲड.विजयकुमार मुंदडा.

## परभणीत दमदार पावसाची हजेरी

परभणी,(प्रतिनिधी) - दोन दिवसापूर्वी झालेल्या पावसाने विश्रांतीनंतर गुरुवारी पुन्हा आपली हजेरी लावली. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सुरु झालेला पाऊस दुपारी २ वाजेपर्यंत सुरुच होता. भीज स्वरुपाचा हा पाऊस शेतीसाठी उपयुक्त असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. या पावसामुळे शहरातील सखल भागामध्ये पाणी साचले. वाहनांतून जातांना पादचाऱ्यांच्या अंगावर पाणी उडाले मात्र या बाबीचा कोणताही राग मनात न धरता जोरदार बरसलेल्या या पाण्याचे सर्वांनी स्वागतच केले.जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह सर्वांना प्रतिक्षा आहे ती जोरदार पावसाची.

परभणी जिल्ह्यातील सर्व माहिती देण्याचे काम.! सर्वदूर जगातील आपले नातेवाईक, प्रेमी, मित्रांशी ई परभणी डॉट कॉम वर चॅटिंग करा. अधिक माहितीकरीता www.eparbhani.comवेबसाईट पहा किंवा फोन २२२१५३ वर संपर्क साधा.

